# 'साय-फाय करंडक' एकांकिका स्पर्धेत 'आमचे आम्ही' संघ विजेता

क्विक हील फाऊंडेशन आणि महाराष्ट्र सायबर आणि थिएटर ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'साय-फाय करंडक' एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरीत पुण्याच्या 'आमचे आम्ही' संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. एफ-५७ नाट्यसंस्कारने द्वितीय, तर मुंबईच्या स्वप्नपूर्ती क्रिएशनने तृतीय क्रमांक पटकाविला. विजेत्यांना बक्षीस वितरण क्विक हील टेक्नॉलॉजीज्चे संजय काटकर, कैलाश काटकर, सचिन पांडकर, थिएटर ॲकॅडमीचे अध्यक्ष प्रसाद पुरंदरे यांच्या हस्ते करण्यात आले. सकळ ललित कलाघर येथे झालेल्या या अंतिम फेरीत परीक्षक म्हणून विजय केंकरे, आनंद इंगळे यांनी काम पाहिले. यावेळी अभिनेते रितेश देशमुख, जॅकी श्रॉफ, श्रीरंग गोडबोले, जितेंद्र जोशी उपस्थित होते.

